


दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २२ वा | शुक्रवार, दि. ०८ ऑगस्ट २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

**विकणे /भाड्याने देणे आहे**

वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.

**संपर्क : डी. बी. शिंदे**

**मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३**

**पत्ता:** अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

# भाजप आणि निवडणूक आयोगाने मिळून मतं चोरली




## ■ महाराष्ट्रात 1 कोटी बनावट मतदार?
## ■ निवडणूक आयोग आरोपीच्या पिंजऱ्यात!
## ■ राहुल गांधींचे 5 खळबळजनक दावे

**पहिला आरोप :** राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेऊन निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. त्यांनी देशातील निवडणुकांत घोटाळा होत असल्याचा आरोप केला आहे. राहुल गांधी यांनी महाराष्ट्रात पाच महिन्यांत पाच वर्षांपेक्षा जास्त मतदार वाढले, असा आरोप राहुल गांधी यांनी केलाय.

**दुसरा आरोप :** तसेच, महाराष्ट्रात लोकसभेच्या निवडणुकीत इंडिया आघाडीचा विजय झाला. पण विधानसभेच्या निवडणुकीत मात्र इंडिया आघाडी पराभूत कशी काय झाली? महाराष्ट्रात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीदरम्यान तब्बल एक कोटी मतदार वाढले, असा दुसरा गंभीर आरोप राहुल गांधींनी केला.

**तिसरा आरोप :** याबाबत आम्ही निवडणूक आयोगाकडे गेलो. पण आमच्या या आरोपांवर त्यांनी प्रतिसाद दिला नाही, असा दिसरा आरोप राहुल गांधी यांनी केला. तसेच निवडणूक आयोगाने आम्हाला डिजिटल डेटा का दिला नाही? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

**चौथा आरोप :** महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीदरम्यान संध्याकाळी 5:30 वाजल्यानंतर मतदान वाढलं. भाजपा आणि निवडणूक आयोगाने मिळून मतं चोरली आहेत. चार पोलिंग बुथवर एकाच व्यक्तीने मतदान केल्याचे समोर आले. एकाच व्यक्तीचे कर्नाटक, महाराष्ट्र आणि यूपीमध्ये मतदान आहे, असाही आरोप राहुल गांधींनी केला.

**पाचवा आरोप :** अनेक मतदारांचे मतदार यातीत फोटोच नाहीत. किंवा मग ते फोटो एवढे छोटे आहेत, जे ओळखायला येतच नाहीत, असा आरोप राहुल गांधी यांनी केला. नव्या मतदारांसाठी फॉर्म 6 चा वापर केला जातो, असा पाचवा आरोपही राहुल गांधी यांनी केला.

**मुंबई (वृत्त सेवा):-** भारतीय जनता पक्षाला लोकसभा निवडणुकीत अपेक्षित यश मिळालं नव्हतं. राज्यातील लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने 48 जागांपैकी 13 जागा जिंकल्या होत्या. तर भाजपला 9 जागांवर समाधान मानावं लागलं होतं.

पण चार-पाच महिन्यांच्या कालावधीनंतर महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजपने एकतर्फी विजय मिळवला. भाजपने सर्वाधिक 132 जागा जिंकल्या तर काँग्रेसला फक्त 16 जागांवर विजय मिळाला. लोकसभा निवडणुकीत विजयाचा झेंडा फडकवणाऱ्या महाविकास आघाडीचा विधानसभा निवडणुकीत मात्र सपशेल पराभव झाला.

याच पार्श्वभूमीवर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि खासदार राहुल गांधी मोठा गौप्यस्फोट केला आहे. मतदार याद्या बोगस असल्याचं आणि खोट्या मतदारांची खोटे पत्ते देऊन मतदार याद्यांमध्ये नोंद केल्याचा आरोप त्यांनी निवडणूक आयोगावर केला आहे. महाराष्ट्र आणि हरियाणा निवडणुकीदरम्यान मतदार वाढले. याबाबतीत असलेले सीसीटीव्ही फुटेज निवडणूक आयोगाने 45 दिवसात नष्ट केले. 40 हजार मतदारांचे खोटे पत्ते देण्यात आले. निवडणूक आयोगाने काँग्रेसच्या प्रश्नांची उत्तरे दिली नाहीत, असं राहुल गांधींनी म्हटलं आहे.

**पत्रकार परिषदेत राहुल गांधी नेमकं काय म्हणाले?**

"संध्याकाळी साडेपाचनंतर महाराष्ट्रात मतदान वाढलं. भाजप आणि निवडणूक आयोगाने मिळून मतं चोरली. महाराष्ट्रात पाच महिन्यात मतदार वाढले. महाराष्ट्रात लोकसभा, विधानसभा निवडणुकीदरम्यान एक कोटी मतदार वाढले. मतदार यादीत मतदार का वाढले? याचा अभ्यास करण्यासाठी आम्ही एक टीम तयार केली होती. मतदार यादी खरी आहे का? हा प्रश्न उपस्थित होतोय. महाराष्ट्र, हरियाणा निवडणुकीत आम्हाला यामागची कारणे समजली. महाराष्ट्रातील लोकसंख्येपेक्षा जास्त मतदार वाढले. प्रत्येक मतदाराचा फोटो घेऊन आम्ही मतदार याद्या तपासल्या. मतदारयादीत मतदार का वाढवले? हा खरा प्रश्न उपस्थित होतो. महाराष्ट्रात पाच महिन्यांत पाच वर्षांपेक्षा जास्त मतदार वोटर लिस्टमध्ये आले.

राहुल गांधी पुढे म्हणाले, "कर्नाटक अंतर्गत चाचणीत 16 जागांचा अंदाज होता. पण प्रत्यक्षात 9 जिंकल्या. मतदारयादीत असलेली लाखो नावं एक एक करून तपासावी लागली. बनावट पद्धतीने मतदान झाल्याचे पुरावे समोर आले आहेत. डिजिटल मतदार यादी देण्यास निवडणूक आयोगाने नकार दिला आहे. निवडणूक आयोगाची भाजपसोबत हातमिळवणी झाली आहे. ही मतदार यादी खरी की खोटी? निवडणूक आयोगाने त्याचं उत्तर द्यावं. निवडणुकांचे निकाला एक्झिट पोलपेक्षा वेगळे असल्याचं समोर आलं. मतदारयादीत बनावट मतदार आहेत का? असाही प्रश्न राहुल गांधी यांनी उपस्थित केला".

राहुल गांधी पत्रकार परिषदेत म्हणाले, महाराष्ट्र आणि हरियाणा निवडणुकीदरम्यान मतदार वाढले. याबाबतीत असलेले सीसीटीव्ही फुटेज निवडणूक आयोगाने 45 दिवसात नष्ट केले. 40 हजार मतदारांचे खोटे पत्ते देण्यात आले. कर्नाटकमध्ये पाच प्रकारे मतांची चोरी करण्यात आली. निवडणूक आयोगाने काँग्रेसच्या प्रश्नांची उत्तरे दिली नाहीत. 11 हजार बोगस मतदारांनी तीन-चार वेळा मतदान केलं. कित्येक मतदारांची नावे अनेक राज्यातील मतदार याद्यांमध्ये नोंदवली गेली, निवडणूक आयेगाने यावर उत्तर द्यावं, असं थेट आव्हान राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाला केलं आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या निकालावर भाष्य करताना बोगस मतदाराचा आरोप केला. विधानसभा निवडणुकीत तब्बल 1 कोटी बोगस मतदार होते, असा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. त्यांच्या या टीकेला आता राज्य निवडणूक आयोगाने प्रत्युत्तर दिलं आहे. राज्य निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना पत्र पाठवलं आहे. काँग्रेसच्या प्रतिनिधींना याआधीच मतदार यादी दिली होती असं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे. राहुल गांधींनी निवडणूक आयोगाला शपथपत्र द्यावं. त्या शपथपत्रात सर्व माहिती नमूद करावी, असं आवाहन निवडणूक आयोगाने केलं आहे. तसेच खोटो शपथपत्र आणि खोटे पुरावे देणं हा गुन्हा असल्याचं देखील निवडणूक आयोगाने म्हटलं आहे.

**निवडणूक आयोगाने पत्रात नेमकं काय म्हटलं आहे?**

"काँग्रेसच्या प्रतिनिधींना 2 वेळा नवीन मतदार यादी पाठवली आहे. मतदार यादीत बोगस मतदार असल्याचा आरोप तुम्ही केला आहे. राहुल गांधींनी निवडणूक आयोगाला याबाबत एक शपथपत्र लिहून द्यावं. पुढील कारवाईसाठी त्या बोगस मतदाराचं नाव नमूद करावं", असं आवाहन निवडूक आयोगाने आवाहन केलं आहे.

"खोटं शपथपत्र देणं हा कलम 31 नुसार गुन्हा आहे. खोटे पुरावे देणं हा भारतीय न्यायसंहितेच्या कलम 227 नुसार गुन्हा आहे", असंदेखील निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना बजावलं आहे. तसेच "तुम्ही स्वतः त्या संबंधित मतदारसंघाचे मतदार आहात की नाही हे सुद्धा नमूद करावे", असंदेखील निवडणूक आयोगाने बजावलं आहे.

**राहुल गांधी यांचे नेमके आरोप काय?**

राहुल गांधी यांनी मतदान चोरीचा आरोप केला आहे. एकूण पाच पद्धतीने मतदान चोरीचा पॅटर्न असल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीनंतर अवघ्या सहा महिन्यात 1 कोटी नवे बनावट मतदार वाढल्याचा आरोप राहुल गांधींनी केला. बनावट मतदार, फेक आणि चुकीचा मतदारांचा पत्ता, एकाच पत्त्यावर अनेक मतदार, चुकीचे फोटो आणि फॉर्म 6 चं उल्लंघन या पद्धतीने बनावट मतदार वाढवण्यात आल्याचा आरोप राहुल गांधींनी केला. यासाठी राहुल गांधींनी कर्नाटक विधानसभा निवडणुकीमध्ये महादेवपुरा मतदारसंघांचं उदाहरण देत थेट आकडेवारी मांडली. त्यांच्या आरोपांना आता निवडणूक आयोगाने प्रत्युत्तर दिलं आहे. या प्रकरणात आता आगामी काळात काय-काय घडामोडी घडतात ते पाहणं महत्त्वाचं आहे.

# माढा-कुर्डूवाडी रस्त्यावर एसटी बस अन कारचा भीषण अपघात



## एक ठार, १५ हून अधिक जखमी

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा-कुर्डूवाडी रोड येथील वळणाजवळ आलिशान कार व एसटी बसचा भीषण अपघात झाला. या अपघातात १४ जण जखमी झाले आहेत. या अपघातात एकाचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास घडली. वैरागहून बोरवलीकडे प्रवासी घेऊन जाणारी एसटी माढ्यातील वळणाजवळ येत असताना कुर्डूवाडीहून येणाऱ्या कारचा अपघात झाला. यामध्ये एसटी बसमधील १४ प्रवासी जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. तर कारमधील एक जण मयत झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. जखमीवर माढ्यातील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# गोवंश हत्या बंदी कायद्यातील जाचक अटी रद्द करा, सोलापुरात संतप्त मोर्चा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गोवंश हत्या बंदी कायद्यातील जाचक अटी रद्द कराव्यात, या मागणीसाठी आज सोलापुरात एक भव्य मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा पशुपालक, शेतकरी आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या कृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून सकाळी मोर्चाला सुरुवात झाली.



पूनम गेट येथे हा मोर्चा संपणार असून शहरातील मुख्य मार्गांवरून मोर्चाचे आयोजन करण्यात आले. मोर्चामध्ये भारतीय राष्ट्रध्वज तिरंगा तसेच निळा, भगवा आणि पिवळा रंग असलेले झेंडे मोठ्या प्रमाणात फडकवण्यात आले. या मोर्चामध्ये सोलापूर शहरासह जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या १० ते १५ हजारांहून अधिक नागरिकांचा सहभाग पाहायला मिळत आहे. मोर्चात सहभागी झालेले शेतकरी आणि पशुपालक यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून, त्यांनी गोवंश हत्या बंदी कायद्यातील अंमलबजावणीच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

नागरिकांनी निळ्या, भगव्या, पिवळ्या झेंड्यांसह घोषणाबाजी करत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

# मोदी, शहांकडे शिंदेंनी गाऱ्हाणी मांडली



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामध्ये सुप्त संघर्ष सुरु असल्याची चर्चा असताना शिंदे यांनी काल दिल्लीत जाऊन भाजप नेतृत्त्वाच्या भेटीगाठी घेतल्या.

गेल्या महिन्याभरात शिंदे तीनवेळा दिल्लीला गेले आहेत. मात्र गेल्या दोन दौऱ्यांमध्ये त्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहांची भेट मिळाली नव्हती. त्यामुळे त्यांना रिकाम्या हातानं परतावं लागलं होतं. अखेर काल शिंदे यांना मोदी, शहांची भेट मिळाली. दोन्ही नेत्यांनी संसदेचं पावसाळी अधिवेशन सुरु असतानाही शिंदे यांना पुरेसा वेळ दिला. महायुतीत लक्ष घाला, अशी विनंती शिंदे यांनी दोन्ही नेत्यांकडे केली. त्याचवेळी राज्यात मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांच्यावर स्पष्टपणे कुरघोडी केली.

महायुती सरकारमध्ये शिवसेनेच्या मंत्र्यांना, आमदारांना अडचणीत आणलं जात असल्याची एकनाथ शिंदे यांची तक्रार आहे. शिवसेना हा भाजपचा सर्वात जुना मित्र पक्ष असल्यानं सन्मानाची वागणूक मिळावी, पक्षाच्या मंत्र्यांना अडचणीत आणलं जाऊ नये, अशा मागण्या शिंदे यांनी मोदी, शहांकडे केल्याची सुत्रांची माहिती आहे. फडणवीस सरकारमध्ये शिवसेनेच्या मंत्र्यांना गोत्यात आणलं जात असल्याची पक्षातील अनेकांची भावना आहे.

याच संदर्भात शिंदे दिल्लीत जाऊन कैफियत मांडताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुन्हा एकदा कुरघोडी करणारा निर्णय घेत ताकद दाखवून दिल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात आहे.

बेस्टच्या महाव्यवस्थापक पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सामान्य प्रशासन विभागानं काल आदेश काढला. विशेष म्हणजे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे (पान 2 वर..)







# पोलीस भरती, स्पर्धा परीक्षा करणाऱ्यांची सरकारकडून निराशा

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्य शासनाच्या अनेक विभागातील पदे रिक्त असून, मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतरही पोलीस भरती रखडली आहे. आयोगाकडून सरळ सेवा, पोलीस भरती परीक्षांचे नियोजन करण्यात येत नसल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

त्यामुळे केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी), महाराष्ट्र लोकसेवा आयोगाप्रमाणे (एसपीएससी) या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्याची मागणी विद्यार्थी समन्वय समितीने केली आहे.

शासनाच्या या धोरणाचा फटका राज्यातील सुमारे २५ लाख विद्यार्थ्यांना बसत असून, केरळ-तामिळनाडू या राज्यांप्रमाणे दरवर्षी वेळपत्रक जाहीर करून सरळ सेवा-पोलीस भरती प्रक्रिया राबविण्याची मागणी विद्यार्थ्यांनी पत्रकार परिषदेत केली. यावेळी विद्यार्थी समन्वय समितीचे अध्यक्ष



विठ्ठल बडे, ज्ञानेश्वर बांगर, सुशांत ढेकळे उपस्थित होते.

'विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १३,५६० पोलिसांची रिक्त पदे भरण्याची घोषणा केली होती. त्यापूर्वी जून महिन्यात पोलीस महासंचालकांनी सुमारे १० हजार पोलिसांची भरती करण्याचे आणि १५ सप्टेंबरला मैदानी चाचणी होणार असल्याचे सांगितले होते. मात्र, अद्याप पोलीस भरतीची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली नाही. सप्टेंबरपूर्वी शासन निर्णय, अर्ज भरणे, अर्ज छाननी आणि परीक्षा घेणे अशक्य आहे. त्यामुळे पोलीस भरतीचे आश्वासन पुन्हा एकदा हवेत विरणार असल्याची शक्यता निर्माण झाली आहे. तीच स्थिती सरळ सेवा भरतीची आहे,' असे बडे यांनी सांगितले.

ते म्हणाले,'निवडणुकीच्या प्रचारात महायुतीकडून रिक्त पदे भरण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मंत्रीमंडळाच्या पहिल्या बैठकीत विविध विभागांतील ५० हजार रिक्तपदे भरणार असल्याचे सांगण्यात आले. प्रत्यक्षात मात्र एकाही पदासाठी जाहिरात देण्यात आलेली नाही. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका टप्प्याटप्प्यात होणार असल्याने सुमारे दोन महिने आचारसंहिता असेल. त्याकाळात भरती प्रक्रिया राबवता येणार नाही.'

आयोगाकडून सरळ सेवा, पोलीस भरती प्रक्रिया राबवण्यासाठी वेळापत्रक जाहीर करावे. त्याची वेळेवर अंमलबजावणी व्हावी. शासनाने याबाबत ठोस उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.- विठ्ठल बडे, अध्यक्ष, विद्यार्थी समन्वय समिति

## संपादकीय

# बैठकांचा जोर

देशातील बिहारसह काही राज्यांमध्ये लवकरच होर्णाया विधानसभा निवडणुका असोत किंवा महाराष्ट्रासारख्या राज्यामध्ये स्थानिक पातळीवर होर्णाया निवडणुका असो, या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांमध्ये सर्वच राजकीय पक्षांमध्ये आणि या पक्षांचे प्रतिनिधित्व करर्णाया नेत्यांमध्ये बैठकांचा आणि भेटीगाठींचा जोर वाढत चालला आहे. काँग्रेसच्या नेतृत्वाखाली केंद्रीय पातळीवर जी इंडिया आघाडी स्थापन करण्यात आली आहे त्या आघाडीची महत्त्वाची बैठक 7 ऑगस्ट रोजी राजधानी नवी दिल्ली येथे होणार आहे. बैठकीला इंडिया आघाडीच्या सर्व घटक पक्षांचे नेते उपस्थित राहणार आहेत. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिवसेना उबाठा नेतेसुद्धा या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांची राज ठाकरे यांच्याबरोबर जवळीक वाढण्याच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना हा पक्ष महाराष्ट्रातील महाविकास आघाडीमध्ये किंवा केंद्रीय पातळीवरील इंडिया आघाडीमध्ये राहील का नाही, याबाबत शंका व्यक्त केली जात असतानाच उद्धव ठाकरे यांनी राहुल गांधी यांचे बैठकीचे आणि स्नेहभोजनाचे निमंत्रण स्वीकारले आहे.

दुसरीकडे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गेल्या आठवडाभराच्या कालावधीमध्ये दोन वेळा राजधानीचा दौरा करून आले आहेत. या दौर्यामध्ये त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यासह राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील काही घटक पक्षांच्या नेत्यांचीही भेट घेतली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्याच आठवड्यात राजधानीमध्ये तब्बल तीन दिवस मुक्काम ठोकून महत्त्वाच्या नेत्यांबरोबर चर्चा केल्याच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा हा दौरासुद्धा चचेर्चा ठरला. महाराष्ट्र राज्याचा विचार करता गेल्या काही दिवसांच्या कालावधीमध्ये ठाकरे बंधूंचे एकत्रीकरण हाच जास्त चचेर्चा विषय आहे. गेल्या महिनाभराच्या कालावधीमध्ये हे बंधू दोन वेळा एकत्र आले. एकदा ठरवून एका मेळाव्यासाठी एकत्र आले आणि दुर्सयांदा उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसासाठी राज ठाकरे जाणीवपूर्वक मातोश्रीवर गेले. नंतर शेतकरी कामगार पक्षाच्या मेळाव्यामध्ये सुद्धा राज ठाकरे व्यासपीठावर दिसले आणि या व्यासपीठावर शिवसेना उबाठा नेतेही उपस्थित होते. एकूणच या सर्व घडामोडी पाहता सर्वच राजकीय पक्षांचे नेते सक्रिय झालेले दिसतात. जरी आगामी कालावधीमध्ये बिहार विधानसभेची निवडणूक सर्वात महत्त्वाची निवडणूक असली तरी स्थानिक आणि प्रादेशिक पातळीवरसुद्धा आपल्या पक्षाचे महत्त्व अबाधित ठेवण्यासाठी किंवा ते अधिक वाढवण्यासाठी अशाप्रकारे बैठकांचा जोर वाढत चालला आहे. महाराष्ट्रामध्ये दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे फटाके फुटणार हे निश्चित झाल्याने आतापासूनच प्रत्येकाचे शक्तीप्रदर्शन सुरू झाले आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी अद्यापपर्यंत थेटपणे आपण निवडणुकीसाठी एकत्र येणार आहोत अशी घोषणा केलेली नाही. उलट दोनही नेत्यांनी आपापल्या कार्यकर्त्यांना स्वबळावर निवडणुकीची तयारी करा असाच संदेश दिला आहे. महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे घटक पक्षही महापालिका किंवा नगरपालिका निवडणुका एकत्रपणे लढवतील असे वाटत नाही. ज्या महापालिकेमध्ये किंवा नगरपालिकेमध्ये जो पक्ष बलवान आहे त्याला निश्चितच स्वबळाची अपेक्षा असल्याने महाविकास आघाडीचे गणित स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जमवले जाईल असे वाटत नाही. दुसरीकडे विरोधकांची ताकद वाढत आहे असे जर दिसले, तर महायुतीचे सर्व घटक पक्ष मात्र महापालिका निवडणुका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इतर निवडणुका महायुती म्हणून एकत्र लढतील असेच दिसते. यासाठीच हा सर्व जोरबैठकांचा विषय सुरू आहे. नवी दिल्लीमध्ये 7 ऑगस्ट रोजी इंडिया आघाडीची जी महत्त्वाची बैठक होणार आहे त्यामध्येही या आघाडीचे भवितव्य आणि महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे भवितव्य निश्चित होणार आहे. केंद्रातील मोदी सरकारला किंवा एकूणच भारतीय जनता पक्षाच्या राजकारणाला विरोध करण्यासाठी कोणती रणनीती महत्त्वाची ठरू शकेल याचा विचार या इंडिया आघाडीच्या बैठकीमध्ये होऊ शकतो. बिहार विधानसभा निवडणुकीमध्ये कोणती रणनीती आखायची हा सर्वात जास्त महत्त्वाचा विषय ठरणार आहे. कारण बिहार विधानसभा निवडणुकीमध्ये भाजप आणि नितीश कुमार यांचा संयुक्त जनता दल यांना जर यश मिळाले नाही तर तो मोठा धक्का ठरणार असल्याने बिहार विधानसभा निवडणूक हाच एक टॉपचा मुद्दा या बैठकीत असू शकतो.

एकूणच येत्या काही कालावधीमध्ये विविध प्रकारच्या निवडणुकीमध्ये राजकीय वातावरण तापणार असल्याने आपापली मैत्री घट्ट करण्याकडे किंवा नवीन मित्र जोडण्याकडेच सर्व राजकीय पक्षांचा कल दिसत आहे. अर्थात नक्की राजकीय चित्र स्पष्ट होण्यासाठी आगामी कालावधीमध्ये अशा प्रकारच्या बैठकांची आणि भेटीगाठींची संख्या आणि तीव्रताही वाढत जाणार आहे, असे संकेत यानिमित्ताने मिळत आहेत.

# नैसर्गिक महाप्रलय व मुलभूत सुविधांच्या अभावामुळे लोक मरत आहेत; आणि संसदेत पक्ष-विपक्ष एकमेकांवर ताशेरे ओढतात, हे चाल्लय तरी काय!

आपण नेहमी पहातो की बदलत्या हवामानामुळे उत्तराखंड सारख्या अनेक भागांत दरवर्षी महाप्रलयाची स्थिती निर्माण होत असते. ज्या ठिकाणी पर्यटक आपली हजेरी लावुन सरकारची तिजोरी भरत असते.बिहार सारखे अनेक राज्य असे आहेत की तेही पावसाळ्यात जलमग्न होतात व अनेकांचा बळी जातो. त्याचप्रमाणे देशात २८ राज्ये व ८ केंद्र शासित प्रदेश आहेत.या प्रत्येक राज्यात लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी आणि सरकारी यंत्रणा आहे.परंतु आजही प्रत्येक राज्यात काही जिल्हे असेही आहेत की त्या ठिकाणी मुलभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणात अभाव दिसून येतो.आजही अनेक गावांमध्ये पुलांची व्यवस्था नाही अशा परिस्थितीत ग्रामस्थ व विद्यार्थी आपला जीव धोक्यात टाकून तारेवरची कसरत करतात व आपले काम पुर्ण करतात. अशा अनेक मुलभूत गोष्टींकडे सरकार, पक्ष-विपक्ष जातीने लक्ष न देता व अशा महत्वपूर्ण मुद्द्यांवर चर्चा न करता राजकीय डावपेचांच्या चर्चा करून संसदेचा वेळ वाया घालवितात हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. आज महागाई विकोपाला जाऊन पोहोचली, अनेक राज्यांमध्ये आजही कुपोषणाची परिस्थिती आहे यावर कोणीच चर्चा करण्यास तयार नाही, शिक्षण अत्यंत महागडे झाले आहे यावरही चर्चा करण्यास कोणी तयार नाही, टेरिफ युद्धामुळे सर्वसामान्य व गरीब यांच्यावर भार पडत आहेत,शेतकऱ्यांच्या आत्महत्यां अजुन पर्यंत थांबलेल्या नाहीत,बेरोजगारी वाढतच आहे, नवीन धोरणानुसार कंत्राटी पद्धतीने भरतीला सुरूवात केली आहे, निवृत्त कर्मचाऱ्यांना पुन्हा पाच वर्षापर्यंत काम करण्याची संधी सरकार देत आहे आणि राजकीय पुढारी दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे.या संपूर्ण गोष्टींमुळे मुलभूत सुविधां, शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी व महागाई यावर अजून पर्यंत अंकुश लागु शकला नाही.कारण संसदेत पक्ष-विपक्ष जास्तीत जास्त फक्त राजकारणावरच चर्चा करतांना दिसतात यावर सरकारने गांभीयार्ने विचार करण्याची गरज आहे आणि देशातील मुलभूत सुविधांकडे लक्ष दिले पाहिजे.आज सर्वच क्षेत्रात अत्याधुनिक सुविधा मोठ्या प्रमाणात आहेत.रस्त्यांचे जाळे संपूर्ण भारतात विनल्या गेले आहे. परंतु या संपूर्ण सुविधांवर पावसाळ्यात पाणी फेरल्या जाते व अनेक भाग जलमग्न होतांना आपण पहातो व याचा परिणाम देशातील गरीब व सर्वसामान्यांना भोगावे लागतात. आज आपण जगाच्या दृष्टीकोनातून विचार केला तर धार्मिक स्थळी चेंगराचेंगरी प्रमाण भारतात मोठ्या प्रमाणात वाढले आहे यावर आपण अजून पर्यंत नियंत्रण ठेवू शकलो नाही किंवा यावर संसदेत चर्चा होत नाही.अशा अनेक भयावह घटना डोळ्यासमोर होत आहे. परंतु पक्ष विपक्ष फक्त आपली राजकीय पोळी शेकण्यासाठी लिपापोती करतात व सर्वसामान्यांना वाऱ्यावर सोडून देतात ही सत्य परिस्थिती आहे. केंद्र सरकार व राज्य सरकार यांना कल्पना असते की पावसाळ्यात अती दुर्गम भागात किंवा पहाडी भागात ढगफुटी,पहाड कोसळने किंवा नद्यांना महापुर येणे अशा अनेक भयावह घटना होतात अशा परिस्थितीत केंद्र व राज्य सरकारे समन्वय साधून वेळेच्या आधीच नागरिकांना हलविने किंवा धोकादायक स्थळावरील पर्यटकांवर पुर्णतः बंदी घालने असे कठोर उपाययोजना का केल्या जात नाहीत ? आपण पहाले की देशातील अनेक राज्यांमध्ये ढगफुटीच्या घटनेमुळे डोंगराच्या पायथ्याशी असलेली गावे जमीनदोस्त झालीत व मोठ्या प्रमाणात प्राणहानी सुध्दा झाली आणि आताही होत आहे याचे जिवंत उदाहरण दिनांक ५ ऑगस्ट २०२५ उत्तराखंडच्या पर्वतीय भागातील उत्तरकाशीमध्ये ढगफुटीचा मोठा तडाखा बसला असुन गंगोत्री मार्गावरील "धराली" गावांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने हाहाकार माजला व या घटनेत ४ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण अजूनही ढीगाऱ्याखाली दबले आहेत व त्यांची घरे सुध्दा जमीनदोस्त झाली आहे. अशा घटनांकडे राज्य सरकार व केंद्र सरकारने अलर्ट रहाने गरजेचे आहे. कारण बदलत्या हवामानामुळे सुनामी, ढगफुटी, ग्लेशियर वितळने,भुस्कखलन,भुकंप, अती पाऊस, अती उष्णता, समुद्राची पातळी वाढने अशा अनेक भयावह व अंगावर शहारे येणाऱ्या घटना दिवसेंदिवस वाढण्याची दाट शक्यता आहे. परंतु ज्या दुर्घटनांपासुन आपण मानवजातीला वाचवु शकतो व वाचवण्यासाठी पुर्वतयारी करू शकतो अशा घटनांवर सरकारचे नियंत्रण असने अत्यंत गरजेचे आहे.कारण नैसर्गिक आपदा कधिच सांगुन येत नाही त्यामुळे ती केंव्हा भयानक रूप धारण करेल याची आपण कल्पना सुद्धा करू शकत नाही. त्यामुळे संपुर्ण राज्य सरकारांनी पर्यटकांना व धोकादायक स्थळावरील लोकांना सतर्क करून त्यांना महाप्रलयच्या आधीच हलविले पाहिजे जेणेकरून जीवित हानी व वित्तीय हानी रोखण्यास मदत होईल.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## प्रबोधन

# अतिरेकीपणा । करू नये कोणी

राजा मिडासने म्हणे ज्या वस्तुला मी हात लावीन ती वस्तू सोन्याची व्हावी, असं वरदान मिळवलं होतं. ही गोष्ट खरी नसली तरी तिची कल्पना मनोरंजक आहे. श्रोत्यांना क्षणभर वाटतं की, आपणाला असा वर मिळाला, तर काय बहार होईल! दुसऱ्या क्षणी श्रोत्यांना मिडासचा मत्सर वाटू लागतो आणि तिसऱ्या क्षणी मिडास सोन्याचे अन्न खाऊ शकेना, सोन्याचे पाणी पिऊ शकेना हे ऐकून त्यांना सुडाचं समाधान मिळू लागतं. कशी फजिती झाली हावरटाची! असं ते मनातून हरखून म्हणत राहातात.

असं जरी असलं तरी सोने ते सोनेच! प्राणापलीकडे प्रिय मुलं-मुली सोन्या आणि सोनीच असतात. देशाच्या एकूण इतिहासातील समृद्धीने तुडुंब भरलेला काळ हा सुवर्णयुग असतो; आणि त्याचे तपशील सुवर्णाक्षरात लिहावे लागतात. एखादी संस्था पन्नास वर्षांचा टप्पा ओलांडते आणि साजरा केला जातो सुवर्णमहोत्सव. प्रथम क्रमांकाच्या खेळाडूला सुवर्णपदक तर दिलं जातंच; पण त्याने मिळवलेले गुण आजवरचे विक्रम मोडणारे असतील, तर त्याने खेळाच्या इतिहासात सोन्याचं पान लिहिलं असंच क्रीडावृत्तलेखक म्हणतात. खोट्या देवाच्या खऱ्या मंदिराचा दिमाख भाविकांचे खिसे फाडूनच मिरवावा असे स्वार्थी, पोटभरू, पुजाऱ्यांना किंवा देवस्थान कमिटीला जेव्हा वाटतं, तेव्हा मंदिरावर चढवला जाणारा कळस सोन्याचाच असतो. मागे मुंबईच्या सिद्धिविनायकाच्या मंदिरावर काही किलो सोन्याचा कळस करताना केळकर नावाच्या सराफाने त्यातलं बरंच सोने खाऊन श्रीच्या कृपाप्रसादाने आपल्या घराण्याचा इतिहास सुवर्णांकित केला होता.

सोन्याच्या लोभाने खाटकासारख्या निर्दयी नराधमांनी किती निरागस बायकापोरांचे गळे चिरले, याला गणती नाही. सोन्याच्या किल्लीने उघडत नाही असं जगात एकही कुलूप नाही, असं भ्रष्टाचाराचं अलंकारिक वर्णन जॉर्ज हर्बर्ट हा विचारवंत करतो. पण म्हणून सोन्याचा त्यागच करा, असं समाजहितेच्छू सज्जन म्हणत नाहीत. संत तुकाराम स्वतःसाठी सोने नको म्हणतात. पण समाजाने मात्र उत्तम व्यवहाराने धन मिळवावं, असा विचार ते व्यक्त करतात. यालाच विचारवंत सुवर्णमध्य म्हणतात. त्यागही नको आणि भोगही नको. दोन्ही टोकं टाळून सुवर्णमध्य साधणं ही खरी जीवनकला! थोर विचारवंत कवी विंदा करंदीकर जीवनाचे मध्यममार्गी तत्त्वज्ञान व्यक्त करताना म्हणतात, आत्म्यास आत्म्याचे मिळे ते कोण घेईल काढुनी ?। पण इंद्रिया दरडावूनी शरीरास तू हिणवू नको ॥ कारण- पोचायचे जेथे तिथे ना ऊन आणिक सावली ।म्हणुनी वडाच्या खालती अस्वस्थ तू होऊ नको ॥ सोन्यासारख्या संसारावर तुलसीपत्र ठेवणाऱ्या मूर्ख विरक्तांना याहून वेगळं कोण काय सांगणार? स्वामी विवेकानंदांचा आदर्श आपणापुढे ठेवणारे जर ब्रह्माचर्ययुक्त संन्यास हेच जीवनाचं परमोच्च ध्येय मानत असतील, तर त्यांना स्वामीजी कळलेच नाहीत. विवेकानंद म्हणाले, 'बंधूंनो आता सारेजण उठा! शास्त्रातील- अर्थात वैज्ञानिकतत्त्वं लोकांना सोप्या भाषेत समजावून द्या ! तसंच त्यांना व्यवहार, व्यापार, शेती वगैरे गृहोपयोगी गोष्टींचंही शिक्षण द्या! नाही तर धिःक्कार असो तुमच्या शिकण्याला आणि वेदवेदांताच्या अध्ययनाला!'

आज जगभर सर्वच धर्मांनी उपद्रवकारी उच्छाद मांडला आहे. काहींची अतिरेकी धर्मनिष्ठा इतरांनी धर्मत्यागच करावा इतका धर्माचा वीट आणीत आहे. धर्ममुक्तीने धर्मनिष्ठेचं संकट नक्की दूर करता येईल. पण समाज पाप, शाप, नरकवासादी कल्पनांच्या आहारी गेल्याने धर्ममुक्तीला खूप घाबरतो. धर्ममुक्तीच्या क्षितिजावर अजून तांबडंही फुटलेलं नाही. अशा परिस्थितीत धर्माविषयी उदासीनव्रताचं पालन करणं, हा सर्वोत्तम सुवर्णमध्य आहे. देवधमार्शी संबंधित सर्व उपक्रमांना शुद्ध मानवतावादी वळण लावण्याइतका शंभर नंबरी सुवर्णमध्य दुसरा कोणता असणार आहे? मानवतावादाचं सुवर्णयुग त्यामुळे नक्कीच सुरू होईल. म्हणूनच-

अतिरेकीपणा । करू नये कोणी
जगावे सर्वांनी । सुखानेच ॥ १
अतिदुष्टांनी ह्या जगाला छळिले
भिऊनिया मेले । दुर्बळ जे ॥ २
अतिसज्जनांनी । होऊन हैराण
अर्पियले प्राण । दुष्टा पायी ॥ ३
अति तेथे माती। शहाणे म्हणती
समजून घेती । भाग्यवंत ॥४
धर्मराज न व्हा । व्हा न दुर्योधन
चतुर श्रीकृष्ण । जगी व्हावे ॥५
धर्म छळितसे । दुष्टपणे लोका
घनिष्ठता नका । ठेवू त्यासी ॥ ६
धार्मिकांचा तरी । नको तिरस्कार
प्रबोधनावर । दृष्टी ठेवा ।। ७
मध्यममार्गाने। चालावे साऱ्यांनी
मध्यमाचरणी । हित आहे ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# 'मध्यस्त चले जाव' यासह विविध मागण्यांसाठी ८ ऑगस्टला बँकमित्र काळ्याफिती लावून काम करणार

**लातूर (कटूसत्य वृत्त):-** आत्महत्या केलेल्या निलेश गणोरकर या बँक मित्राच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळावी, बँक मित्रांच्या सेवाशर्ती निश्चित करण्यात याव्यात, बँक मित्रांची नियुक्ती पूवीर्सारखीच प्रत्यक्ष बँकेकडून करण्यात यावी, बँक मित्रांना किमान मानधन सुरू करण्यात यावे यासह विविध मागण्यासाठी येणाऱ्या आठ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्यातील सर्व बँक मित्र काळ्याफिती लावून काम करणार आहेत. तसेच ते सेवा देत असलेल्या खेडोपाड्यातील जनतेपर्यंत आपल्या या मागण्या घेऊन जाणार आहेत. आठ तारखेला प्रत्येक जिल्ह्याच्या अग्रणी बँक मॅनेजरला भेटून आपल्या मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र स्टेट बँक मित्राज असोसिएशन च्या मार्फत बँक मित्र देणार आहेत.

वित्तीय समावेशनाच्या नावाखाली बँकिंग खेडोपाड्यापर्यंत जावी या उद्देशाने रिझर्व बँक व राष्ट्रीयकृत बँकांनी बँक मित्र हे नवीन मॉडेल विकसित केले. खेडोपाड्यातील लोकांना बँकिंग सेवा पुरवणे, त्यांना बँकिंग च्या परिघात आणणे व केंद्र आणि राज्य सरकारच्या बँकेकडून राबवित असलेल्या वेगवेगळ्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवणे हे एक मोठे काम बँकमित्रांच्या माध्यमातून सुरू आहे. हे प्रारूप विकसित झाल्यानंतर सुरुवातीच्या काळामध्ये बँक मित्रांची नेमणूक बँकांकडून प्रत्यक्षपणे केली जायची. परंतु मागील काही वषार्पासून बँक मित्रांची नेमणूक मध्यस्थ कंपनीमार्फत केली जाते आहे. ज्यामुळे बँक मित्रांनी केलेल्या कामातील कमिशनचा मोठा हिस्सा या मध्यस्थ कंपनीला द्यावा लागतो आहे. अनेक बँकांनी मागील दोन ते चार वषार्पासून बँक मित्रांच्या कमिशनमध्ये अचानकपणे निम्म्याहून जास्त कपात केलेली आहे. व हे सर्व करताना त्यांनी बँक मित्रांना कुठेही विश्वासात घेतलेले नाही. समाजामध्ये वय वाढेल तसे प्रत्येक व्यक्तीच्या जबाबदाऱ्या वाढत असतात. मुलांचे शैक्षणिक खर्च, वृद्ध आई-वडिलांचे आरोग्यावरील खर्च वाढत असताना सोबतच त्यांना वाढलेल्या महागाईचा सुद्धा सामना करावा लागतो आहे. म्हणजे एकीकडे जबाबदाऱ्या व खर्च वाढत असताना बँकेकडून मिळणारे कमिशन मात्र निम्म्याहून कमी झालेले आहे. त्यामुळे आर्थिक ताण-तणावाचा सामना बँक मित्रांना करावा लागतो आहे यातूनच अनेक बँक मित्र आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत.बँक ऑफ महाराष्ट्राच्या वर्धा जिल्ह्यातील तळेगाव शाखेत बँक मित्र म्हणून काम करणाऱ्या निलेश गणोरकर या बँक मित्राने आर्थिक ताण-तणावातून नुकतीच आत्महत्या केली. ही गोष्ट फक्त एका निलेश पुरतीच मर्यादित नसून निलेश सारखे अनेक बँक मित्र आर्थिक ताण-तणावामुळे आत्महत्या करण्याच्या विचारापर्यंत येऊन ठेपलेले आहेत. या देशातील खेडोपाड्यापर्यंत व समाज घटकांच्या शेवटच्या व्यक्तीपर्यंत आम्ही बँकिंग पोहोचवू शकलो असे म्हणून शासन एकीकडे आपली पाठ थोपवून घेत आहे तर ज्या लोकांनी प्रत्यक्षरीत्या शेवटच्या लोकांपर्यंत व खेडोपाड्यापर्यंत बँकिंग पोहोचवण्याचं काम केलं त्यांना आत्महत्येच्या दारात नेऊन उभे करण्याचे पाप हे सरकार करते आहे.

पर्यावरणीय अरिष्ठामुळे ज्याप्रमाणे शेतकऱ्यांची शेती आज अडचणीत आलेली आहे त्याचप्रमाणे शासनाच्या कंत्राटीकरणाच्या विविध प्रारूपांमुळे देशातील लाखो तरुण आज देशोधडीला लागत आहेत. बँक मित्रांच्या आज होणाऱ्या नियुक्त्या हे बँकेतील कंत्राटीकरणाचेच एक स्वरूप आहे. आज रोजी बँक मित्रांना कुठल्याही प्रकारच्या निश्चित सेवाशर्ती नाहीत. बँकेच्या व मध्यस्त कंपनीच्या उच्च पदस्थ अधिकाऱ्यांकडून बँकमित्रां वरती वेळोवेळी वेगवेगळ्या कामासाठी अनेक दडपणे आणली जातात. तुम्हाला इतकी इतकी कामे इतक्या इतक्या वेळात करावीच लागतील अन्यथा तुम्हाला सेवेतून हाकलून दिले जाईल यासारख्या धमक्या तर त्यांच्या दररोजच्याच होऊन बसलेल्या आहेत. बँक मित्रांना अरेरावी पद्धतीने वागवून बँका व मध्यस्त कंपन्या काम करून घेतात परंतु वेतन देताना मात्र दोन दोन तीन तीन महिन्याचे त्यांचे वेतन प्रलंबित असते. त्यांना वेळेवरती वेतन मिळत नाही त्याचप्रमाणे आपण नेमकी किती कामे केली आहेत व कोणत्या कामाचे कमिशनचे दर नेमके काय आहेत या संदर्भात सुद्धा बँक मित्रांना वेळोवेळी माहिती दिली जात नाही परिणामी आपण करत असलेल्या कामाचे कमिशन नेमके किती होते आहे हे सुद्धा बँक मित्रांना माहिती नसते. लॅपटॉप,स्टेशनरी, विज बिल,दुकान चे भाडे यासारख्या गोष्टींचे खर्च सुद्धा मिळणाऱ्या कमिशन मधून भागत नाहीत. राष्ट्रीयकृत बँका,केंद्र व राज्य सरकार आणि रिझर्व बँक या सर्वांनी तात्काळ बँक मित्रांच्या या गोष्टीकडे लक्ष देऊन कमिशनमध्ये वाढ करणे, मध्यस्त कंपनीच्या ऐवजी बँकेकडून प्रत्यक्ष नेमणूक करणे यासारख्या बँक मित्रांच्या मागण्या त्वरित मान्य कराव्यात यासाठी 8 ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्यातील सर्व बँक मित्र काळ्याफिती लावून काम करणार आहेत. जर सर्व यंत्रणांनी याची गंभीर दखल घेतली नाही तर भविष्यात तीव्र आंदोलनाचा इशारा बँक मित्रांच्या वतीने देण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यात यावेळी महाराष्ट्र स्टेट बँक मित्राज असोसिएशन या AIBEA शी संलग्न संघटनेच्या वतीने राज्यातील सर्व जिल्ह्याच्या अग्रणी बँक मॅनेजर यांना निवेदन देण्यात येणार आहे, असे संघटनेचे नेते कॉ.देविदास तुळजापूरकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

पान १ वरून

## मोदी, शहांकडे शिंदेंनी गाऱ्हाणी...

यांच्या अखत्यारित येणाऱ्या नगरविकास विभागानं आधीच यासंदर्भातील आदेश काढलेला होता. आयएएस अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या आणि बदल्यांचे अधिकार सामान्य प्रशासन विभागाकडे आहेत. बेस्टचे महाव्यवस्थापक श्रीनिवास निवृत्तीमुळे पद रिक्त झालं होतं. त्यामुळे विभागाचे सहसचिव सुभाष उमराणीकर यांनी वस्तू आणि सेवा कर आयुक्त असलेल्या आशिष शर्मा यांच्याकडे महाव्यवस्थापक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवला. तसे आदेश उमराणीकर यांनी बुधवारी काढले.

विशेष म्हणजे सामान्य प्रशासन विभागानं आदेश जारी करण्यापूर्वी नगरविकास विभागानं याबद्दलचे आदेश जारी केले होते. बेस्ट उपक्रम मुंबई महापालिकेच्या अंतर्गत येत असल्यानं आणि सध्या महापालिकेचा कारभार नगरविकास विभागाकडून चालवला जात असल्यानं या विभागाच्या सहसचिव विद्या हम्पय्या यांच्या स्वाक्षरीनं महापालिकेत कार्यरत असलेल्या अश्विनी जोशी यांच्या नियुक्तीचे आदेश मंगळवारी काढले होते. शिंदे यांच्या खात्यानं आदेश जारी केलेला असताना फडणवीस यांच्या खात्यानं आदेश काढला. त्यामुळे शिंदे दिल्लीत असताना राज्यातील प्रशासनावरील वर्चस्व फडणवीस यांनी दाखवून दिल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली.

# अक्कलकोट नगरपरिषदेचे रोखपाल प्रकाश लिगाडे यांचा सत्कार

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** येथील नगरपरिषदेचे रोखपाल प्रकाश लिगाडे यांचा सेवापूर्ती समारंभ मंगरुळे फंक्शन हॉल येथे सन्मानपूर्वक पार पडला. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांच्या हस्ते लिगाडे यांचा सपत्नीक सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला.



यावेळी माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, बसलिंगप्पा खेडगी, प्रदीप पाटील, अश्पाक बळोरगी, विनायक येवले, नवनाथ शिंदे, नितीन शेंडगे, शुभम माने, चंद्रकांत धेंडे, शिवरत्न पंडित, राजेंद्र हत्ते, शिवशरण खुबा, विठ्ठल तेली, अमित बनसोडे, सरोजा लिगाडे, लेखाधिकारी विशाल चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. लिगाडे यांनी नगरपरिषदेच्या विविध पदांवर तब्बल ३५ वर्षे सेवा बजावत असताना रोखपाल पदाची जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे आणि समर्पण भावनेने पार पाडली. अधिकारी-कर्मचारी तसेच शहरातील नागरिकांशी सतत संवाद साधत त्यांनी प्रशासनाच्या कामकाजात पारदर्शकता आणि कार्यक्षमतेचा आदर्श निर्माण केला. त्यांच्या कामात प्रामाणिकपणा, निःस्वार्थ वृत्ती आणि सेवाभाव सातत्याने दिसून आला, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. लिगाडे यांचा हा सन्मान त्यांच्या प्रदीर्घ सेवेला, निष्ठेला आणि कर्तव्यपरायणतेला दिलेली एक पोचपावती असल्याचे मत मान्यवरांनी नमूद केले. त्यांच्या कार्यपद्धतीतून आजच्या तरुण अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रेरणा घ्यावी, असेही मनोगत या सोहळ्यात करण्यात आले.

# माजी सैनिक, पत्नी व पाल्यांसाठी 'विशेष गौरव पुरस्कार' अर्ज प्रक्रिया सुरू

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी सैनिक, त्यांच्या पत्नी व पाल्यांसाठी ह्यविशेष गौरव पुरस्कारह्व देण्यात येणार असून, इच्छुकांनी २४ सप्टेंबर २०२५ पर्यंत अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद देवदत्त तुंगार (नि.) यांनी केले आहे.

**पुरस्कारासाठी पात्रताः**

» राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू व पुरस्कार विजेते
» साहित्य, संगीत, नृत्य, नाट्य, संगणक, उद्योजकता व आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य
» देश-राज्याची प्रतिष्ठा वाढवणारे योगदान
» शैक्षणिक क्षेत्रात १०वीत ९०%, १२वीत ८५% पेक्षा अधिक गुण, पदवी/पदव्युत्तर परीक्षेत विद्यापीठात प्रथम क्रमांक, IIT/IIM/AIIMS प्रवेशित विद्यार्थी

**अर्जासाठी आवश्यक कागदपत्रेः**

» वैयक्तिक अर्ज
» विहित नमुन्याचा फॉर्म (डी. डी. ४०) - कार्यालयात उपलब्ध
» बोनाफाईड दाखला
» मार्कशीटची प्रमाणित प्रत
» ओळखपत्राची छायांकित प्रत
» डिसचार्ज बुकमधील फॅमिली डिटेल पानाची झेरॉक्स
» बँक पासबुकची पहिल्या पानाची प्रत
» आधार कार्ड प्रत
» कार्याची पुष्टी करणारी प्रमाणपत्रे, वर्तमानपत्रातील प्रसिद्धी, फोटो इ.

**अर्ज सादर करण्याची अंतिम तारीखः**

२४ सप्टेंबर २०२५ झ त्यानंतर आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

**अधिक माहितीसाठी संपर्कः**

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर
दूरध्वनीः ०२१७-२९९२३६६

## वात्रटिका

### कबुतर जा जा...

कोणी म्हणतं कबुतरखाना
वस्तीत नको, बंद करा...
कोणी म्हणतं असं अचानक
नको नको जरा दम धरा...
आरोग्याची काळजी कोणा
कबुतराची उडवा उडवी आहे...
कबुतरखाना झाकून ठेवला
तिथे ताडपत्री आडवी आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

